महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

वाचा-

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना-

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

अ.क्र	जिल्हा	संस्थेचे नाव व पता	शाळेचे नाव व पत्ता	नवीन शाळा/ दर्जावाढ	मंडळ संलग्नता	शाळेचा प्रकार	शाळेचे माध्यम
१	३	४	५	६	७	८	९
२८८४	नांदेड	श्री साईबाबा सेवाभावी संस्था पावडेवाडी ता.जि.नांदेड 38 भाग्यनगर नांदेड	गुरुकुल पब्लिक स्कुल सर्वे नं 229 ब 3 गुरुजी चौक पुर्णा रोड वाडी बु.	नवीन शाळा	राज्य मंडळ	प्राथमिक ते उच्च माध्यमिक विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.)	मराठी
२८८५	नांदेड	जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ सिडको नविन नांदेड	शांतीनिकेतन पब्लिक स्कुल मालेगांव तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड	नवीन शाळा	सी.बी.एस.ई	प्राथमिक ते उच्च माध्यमिक विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.)	इंग्रजी
२८८६	नांदेड	ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्था वसंत नगर नांदेड	ज्ञान वर्धिनी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक इंग्लिश स्कूल कला व विज्ञान हमरापूर तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड	नवीन शाळा	राज्य मंडळ	प्राथमिक ते उच्च माध्यमिक कला-वाणिज्य (इयत्ता १ ली. ते १२ वी.)	इंग्रजी
२८८७	नांदेड	जगदंबा बहूद्देशिय सेवाभावी संस्था भंडारी तांडा ता. सेनगाव जि.हिंगोली	कुमारेश्वर सेमी इंग्लिश स्कूल सालाईगुडा मु. सालाईगुडा पो. सारखणी ता. किनवट जि. नांदेड	नवीन शाळा	राज्य मंडळ	प्राथमिक ते उच्च माध्यमिक कला-विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.)	मराठी
२८८८	नांदेड	के दिनकर पुजारी चारीटेबल ट्रस्ट परभणी ता व जी परभणी	पद्मावती प्राथमिक ते उच्च माध्यमिक वाणिज्य विज्ञान महाविद्यालय मु पो नेरली ता व जी नांदेड	नवीन शाळा	राज्य मंडळ	प्राथमिक ते उच्च माध्यमिक वाणिज्य-विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.)	मराठी
२८८९	नांदेड	सरस्वती शैक्षणिक प्रतिष्ठान व सेवाभावी संस्था टाकळी b० पितृछाया निवास यशवंत नगर नांदेड तालुका जिल्हा नांदेड	वासवी इंटरनॅशनल स्कूल उमरदरी मुक्काम पोस्ट उमरदरी तालुका मुखेड जिल्हा नांदेड	नवीन शाळा	राज्य मंडळ	प्राथमिक ते उच्च माध्यमिक वाणिज्य-विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.)	इंग्रजी
२८९०	नांदेड	गुरुकृपा ग्रामविकास शेवभावी संस्था तालुका सोनपेत सायखेडा परभणी	गुरुकुल पब्लिक स्कूल दाभाड मुक्काम पोस्ट दाभाड तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड	नवीन शाळा	राज्य मंडळ	उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ६ वी. ते १२ वी.)	मराठी
२८९१	नांदेड	सहयोग सेवाभावी संस्था विष्णुपुरी नांदेड मु. पो. विष्णुपुरी ता. जी. नांदेड - 431606	इंदिरा स्कूल विष्णू पुरी आत पोस्ट विष्णू पुरी ता.जि. नांदेड 431606	दर्जावाढ	राज्य मंडळ	प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.)	मराठी
२८९२	नांदेड	श्री शनेश्वर बहुद्देशीय शिक्षण संस्था बोरगाव को पोस्ट सोनखेड तालुका लोहा जिल्हा नांदेड पिन कोड 431708	ओमसाई इंग्लीश स्कूल सोनखेड ता. लोहा जि.नांदेड	दर्जावाढ	राज्य मंडळ	प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.)	इंग्रजी
२८९३	नांदेड	श्री शीतलादेवी सेवाभावी प्रतिष्ठान बारड तालुका मुदखेड जिल्हा नांदेड मु पो बारड तालुका मुदखेड जिल्हा नांदेड	केंब्रीज इंग्लिश स्कूल बारड ता. मुदखेड जि नांदेड	दर्जावाढ	राज्य मंडळ	प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.)	इंग्रजी
२८९४	नांदेड	तुळजादेवी सेवाभावी संस्था नरसी ता. नायगाव जि. नांदेड 431709	युनिक पब्लिक स्कुल इंग्लिश मेडीयम नरसी ता. नायगाव जि. नांदेड 431709	दर्जावाढ	राज्य मंडळ	प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.)	इंग्रजी
२८९५	नांदेड	गोदावरीबाई बजाज ग्राम विकास प्रकल्प बोथी तालुका उमरी जिल्हा नांदेड	अक्षरज्ञान पब्लिक स्कूल वाडी बु. शुभम मंगल कार्यलय जवळ पूर्णा रोड नांदेड	दर्जावाढ	राज्य मंडळ	प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.)	इंग्रजी
२८९६	नांदेड	किसान शिक्षण प्रसारक मंडळ चेवती मु पोस्ट माणिक हॉस्पिटल शिवाजी नगर मुखेड ता मुखेड जि नांदेड	शंकरराव चव्हाण प्रायमरी मु पोस्ट मुखेड जि नांदेड	दर्जावाढ	राज्य मंडळ	प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.)	मराठी

True copy

HEAD MASTER

शिक्षण उपसंचालक कार्यालय
लातूर विभाग लातूर
दिनांक : 26 JUL 2016

(3)

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ
सिडको नवीन नांदेड.

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे,तसेच,विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत.....

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१२.

२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,यांचा शासन निर्णय क्र.एसएफएस १०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ दि.१७ जून २०१६.

३.मा.शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक)शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे यांचे पत्र क्र.अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/४० दिनांक ०१.०७.२०१६.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नवीन शाळा स्थापन करणे/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या सस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

अ. क्र.	जिल्हा	अर्जदार संस्थेचे नांव	मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीनशाळा / दर्जावाढ	मान्यता वर्ग/ इयत्ता	मान्यता वर्ष
१.	नांदेड	जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ सिडको नवीन नांदेड	शांतिनिकेतन पब्लिक स्कूल,मालेगाव ता.अर्धापूर जि.नांदेड	इंग्रजी	नवीन शाळा (सीबीएसई)	प्राथमिक ते उच्च माध्यमिक विज्ञान शाखा (इ.१ ली ते १२ वी)	२०१६-१७

अटी व शर्ती

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२. शाळेच्या व्यवस्थापनांने **अधिनियम,२००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी (इरादा पत्र)**देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमनानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक माहिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी जिल्हयांच्या शिक्षणाधिकारी (प्राथ/ माध्य) यांच्याकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे.अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापना किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित

राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल

क) **सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यस्थापनास/शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (permission)दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि.२० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र**(N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition)घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition)सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता **ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल.सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष,अटी व शर्तीची पूर्तता करील असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत**(N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

३. परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा/दर्जावाढ** शाळांना

३.१. शासनाच्या वेळोवळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,२०१२**(सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

३.२. शिक्षणाधिकारी यांची अधिनियम,२००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री झाल्यानंतरच शाळेस **प्रथम मान्यता** देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

३.३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**,शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.शासनाने ज्या ठिकाणासाठी/माध्यमासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा/माध्यम व्यतिरिक्त शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

३.४. संस्थेला महाराष्ट्र शैक्षणिक संस्था(शुल्क विनियमन) अधिनियम,२०११ प्रमाणे शुल्क आकारणे बंधकारक राहील.

३.५. महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी(सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतूदीनुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती व त्यासंबंधिची सर्व कार्यवाही करणे बंधकारक राहील.

३.६. या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा/दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना ***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील, याकरिता राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांना नोडलअधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

V-Pkh
(व्हि.के.खोडके)
शिक्षण उपसंचालक
लातूर विभाग लातूर

प्रत- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद,नांदेड यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येते.

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर-

१. मा.उपसचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा.शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे-१.
३. मा.शिक्षण संचालक(प्राथमिक) शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे-१

स्वयंअर्थसहाय्यित नविन शाळा मान्यता

4678

जा.क्र.जिपनां/शिअ/प्रा-5ब/ / 2017-18
कार्यालय शिक्षण विभाग, (मा.)
जिल्हा परिषद, नांदेड
दिनांक :- 11 SEP 2017

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ, सिडको, नवीन ता. जि.नांदेड

विषय:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (अस्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2016-17 या शैक्षणिक वर्षा करिता खाते मान्यता देण्याबाबत.

संदर्भ: 1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनयमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1,6 व 24) 2012
2) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र एसएफएस-1016/प्र.क्र.69/एसएम-2/दि 17.06.2016..
3) मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) म.रा.पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ / 2016/ 1617/301 /40 दि 01.07.2016.
4) मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांचे पत्र क्र जा.क्र. शिउसं/ला / मावि-2/पीपीडी/13737/14018/2016-17 दि. 26.जुलै 2016

वरील विषयी आपणास कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये नवीन शाळा स्थापन करण्याकरीता/विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानूसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या शासन निर्णयानूसार नवीन शाळा स्थापन करण्याकरीता / विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

अ.क	अर्जदार संस्थेचे नांव	मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ	मान्यता वर्ग/ इयत्ता	मान्यता वर्ष
01	जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ, सिडको नवीन नांदेड	शांतिनिकेतन पब्लिक स्कूल, मालेगाव ता. अर्धापूर जि.नांदेड	इंग्रजी	नवीन शाळा (सीबीएसइ)	प्राथमिक ते माध्यमिक (इ 1ली ते 12वी)	2016-2017

अटी व शर्ती

1- प्राथमिक व उच्च शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.
2- पात्र ठरलेल्या संबंधित शाळांच्या व्यवस्थापनांनी अधिनियम 2009 मधील तरतुदींची पुर्तता करुन सन 2016-17 या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनास सन 2016-17 करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापना किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

ब) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळ अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरव परवानगी (Permission* दिलेल्या संस्थानी शासन निर्णय दि.20 जून 2012 मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्रे (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

3- परवांगनी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांची व कार्यबध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 (सन 2013 चा 01) मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

4- संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाण व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

5- यु-डायस डाटा-या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये महिती भरतांना, "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्यासाठी जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पूढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे, संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरिता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा " असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

शासनाने सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर:-

1- मा. सहसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-32
2- मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक) शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे.

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड

शिक्षण विभाग, (प्रा.) जिल्हा परिषद, नांदेड.
रेल्वे स्टेशन रोड कोर्ट समोर वजिराबाद नांदेड-431601
www.zpnanded.in ssnanded1@gmail.com.

दिनांक :-

2533

परिशिष्ट (नमुना-2) 11 APR 2025

प्रति,
मुख्याध्यापक,
शांतीनिकेतन मॉडेल स्कूल मालेगाव ता .अर्धापुर जि. नांदेड

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वये मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी दि. [illegible] च्या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, नांदेड 03.03.2025 ते दिनांक 02.03.2028 पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी इयत्ता पहिली ते आठवी इंग्रजी माध्यम स्वयंअर्थसहाय्य तत्त्वावर , करिता शांतीनिकेतन मॉडेल स्कूल मालेगाव ता .अर्धापुर जि. नांदेड शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालाकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
   (सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि
   (आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवुन घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.
8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- 4046.85 चौ. मीटर
- एकूण बांधकाम क्षेत्र :- 1300.00 चौ.मीटर
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- 1000.00 चौ. मीटर
- वर्गखोल्यांची संख्या :- 14
- कार्यालय नि-भांडार नि-मुख्याध्यापकांची खोली :- 05
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल:- आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा :- आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- आहे
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविष यक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध :- आहे

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेंच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रींडागण हे केवळ शिक्षणाचा व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबइ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15. शाळेचे लेखे सनदी लेखसापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

16. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक (U-Dise No. 27150203208) असा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामाकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

18. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

(डॉ.सविता बिरगे)
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड

प्रतिलिपी :-

1. मा. शिक्षण संचालक (प्रा.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांना सविनय सादर.
2. मा. शिक्षण उपसंचालक लातूर विभाग लातूर यांना सविनय सादर.
3. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अर्धापुर यांना माहितीस्तव .
4. .अध्यक्ष/सचिव शांतीनिकेतन पब्लिक स्कूल मालेगाव ता .अर्धापुर जि. नांदेड यांना माहितीस्तव.

(डॉ.सविता बिरगे)
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड